“पोलीस उप महानिरीक्षक” श्रेणीतील पदोन्नतीबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन आदेश क्र. न्यायाप्र-१०२३/प्र. क्र.३७९(भाग-२)/दोन/पोल-१
दुसरा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई. पिन-४०००३२.
दिनांक: १७.१२.२०२४.

संदर्भ :

१) शासन आदेश, गृह विभाग, क्र. आयपीएस-१७१९/प्र.क्र.३१३/पोल-१, दिनांक ०२.०९.२०२०.

२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. पोमसं/१/७४३०/ पोउप मनि-पदो./नि.सु.२०२०/२०८/२०१९, दिनांक १५.१०.२०२०.

३) मा. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, मुंबई यांनी मूळ अर्ज क्र. ६६४/२०२३ यामध्ये दिलेले दिनांक २९.०१.२०२४ रोजीचे आदेश.

४) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्र.१३५४४/२०२४ यामध्ये दिनांक ०३.१०.२०२४ रोजी दिलेले आदेश.

## शासन आदेश.

मा. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्र. ६६४/२०२३ (श्री. सचिन अशोक पाटील, भा.पो.से. विरुद्ध भारतीय संघराज्य व इतर) यामध्ये मा. न्यायाधिकरणाने दिनांक २९.०१.२०२४ रोजी आदेश दिलेले असून, या प्रकरणी अवमान याचिका क्र. १९४/२०२४ दाखल आहे. त्यास अनुलक्षून तसेच, मा. न्यायाधिकरणाच्या दिनांक २९.०१.२०२४ रोजीच्या आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट पिटीशन क्र.१३५४४/२०२४ (महाराष्ट्र शासन व इतर विरुद्ध सचिन अशोक पाटील व इतर) यामध्ये मा. न्यायालयाने दिनांक ०३.१०.२०२४ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन, श्री. सचिन अशोक पाटील, भा.पो.से. (महा.:२००६) यांना निवडसूची वर्ष २०२० मध्ये भारतीय पोलीस सेवेतील “पोलीस उप महानिरीक्षक” श्रेणीत, याद्वारे, पदोन्नती देण्यात येत आहे.

२. हा शासन आदेश, भारत सरकार, गृह मंत्रालय, परिपत्रक, क्र.४५०२०/११/९७-आयपीएस-दोन, दिनांक १५.०१.१९९९ व “Indian Police Service (Pay) Rules, 2016” यामधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन आदेश, रिट पिटीशन क्र.१३५४४/२०२४ (महाराष्ट्र शासन व इतर विरुद्ध सचिन अशोक पाटील व इतर) आणि रिट पिटीशन क्र.२१२८/२०२४ (महाराष्ट्र शासन व इतर विरुद्ध सचिन अशोक पाटील व इतर) यामध्ये होणा-या न्यायनिर्णयाच्या अधीन राहील.

४. श्री. सचिन पाटील, भा.पो.से., यांचे “पोलीस उप महानिरीक्षक” पदावरील पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५. हा शासन आदेश, सर्वोच्च सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(संदीप गो. ढाकणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी/लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.

प्रत,

१) श्री. सचिन अशोक पाटील, भा.पो.से. (पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांचेमार्फत).
२) सहायक संचालक, भापोसे कक्ष, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) निवड नस्ती, पोल-१.